# बृहन्मुंबई महानगरपालिका

समाज सुधारक घटनातज्ज्ञ

सत्याग्रही

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## यांच्या जागतिक पाऊलखुणा



अर्थतज्ज्ञ तत्त्वज्ञ

कायदेपंडित

समाजशास्त्रज्ञ

शिक्षणतज्ज्ञ

लेखक

राजनीतिज्ञ

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ६७व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त
बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन !!

वर्ष - २०२३

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या नागरी सेवा-सुविधा

१) मंडप आणि व्ही. आय. पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.

२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणा प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्गासह ११ ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.

३) १ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा.

४) मैदान व परिसरात तसेच रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी फिरती शौचालये.

५) पिण्याच्या पाण्याच्या नळांची व्यवस्था. रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याचे पाण्याचे टँकर्स.

६) कर्मचारी व वाहतूक व्यवस्थेमार्फत संपूर्ण परिसरात स्वच्छता.

७) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था आणि मोबाईल चार्जिंगकरीता व्यवस्था.

८) अग्निशमन दलामार्फत आवश्यक त्या सेवांसह चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर जीव रक्षकांसहीत बोटीची व्यवस्था.

९) चैत्यभूमी स्मारकातील आदरांजली कार्यक्रमाचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.

१०) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात स्टॉल्सची रचना.

११) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्खू निवासाची व्यवस्था.

१२) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरीता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.

१३) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरीता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.

१४) तात्पुरत्या स्नानगृहांची व फायबरच्या तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था.

१५) इंदू मिलच्या मागे फायबरची शौचालये व स्नानगृहे आदी व्यवस्था.

१६) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी बाकड्यांची व्यवस्था.

१७) महिला व नवजात बालकांकरीता चैत्यभूमी तसेच शिवाजी पार्क येथे हिरकणी कक्षाची सुविधा.

१८) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.

१९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा आणि जी दक्षिण विभागात माता रमाई भीमराव आंबेडकर पुतळा परिसरात शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय कक्ष आदी व्यवस्था.

२०) दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि दादर (पूर्व) स्वामीनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष, माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.

२१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान असणाऱ्या 'राजगृह' येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.

२२) 'एल' विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथे नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

२३) 'एम' पश्चिम विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, चेंबूर येथे आवश्यक ती व्यवस्था.

- **चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.**
- **चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.**

**महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीचे प्रक्षेपण पाहण्यासाठी खाली दर्शविलेला 'क्यू आर कोड' किंवा 'सोशल मीडिया लिंक' यांचा कृपया उपयोग करावा.**

Youtube
https://bit.ly/6december2023YT

Facebook
https://bit.ly/6december2023FB

Twitter
https://bit.ly/6december2023TT

## सेवा - सुविधांबाबत संपर्क

**प्रशांत सपकाळे**
सहाय्यक आयुक्त ('जी' उत्तर विभाग)
दूरध्वनी : ६९५१ ७८००


**रमाकांत बिरादार**
उप आयुक्त (परिमंडळ -२)
दूरध्वनी : २४१५ ०४००

**डॉ. अश्विनी जोशी**
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर)
दूरध्वनी : २२६२ ०४३३



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

यांच्या
जागतिक पाऊलखुणा



## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन !

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी मुंबई महानगरात आलेल्या अनुयायांना नागरी सेवा - सुविधा पुरवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका सुसज्ज आहे. ही माहिती पुस्तिका देखील या सेवा-सुविधांचाच एक भाग आहे.

बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई महानगरात प्रदीर्घ काळ वास्तव्य होते आणि त्यांच्या अंतिम स्मृतीदेखील चैत्यभूमीच्या रुपाने मुंबईतच आहेत. लाखोंच्या संख्येने चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांना लागतील त्या सर्व सेवा-सुविधा पुरवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली बृहन्मुंबई महानगरपालिका अथक कार्यरत असते. यामध्ये वेगवेगळ्या यंत्रणांचे, संस्था-संघटना, मान्यवर लोकप्रतिनिधी यांच्यासह अनेक ज्ञात-अज्ञात घटकांचे सहकार्य लाभते. प्रतिवर्षाचा अनुभव लक्षात घेवून सातत्याने या सेवा-सुविधांमध्ये संख्यात्मक आणि गुणात्मक आवश्यक ती वाढदेखील करण्यात येते. इतर ठिकाणांहून मुंबईत येणाऱ्या अनुयायांना सर्व नागरी सेवा-सुविधांची माहिती व्हावी, यासाठी सदर माहिती पुस्तिका प्रकाशित करण्यात येते. त्यामध्ये चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसराच्या नकाशापासून ते उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा, अनुयायांसाठी महत्त्वपूर्ण सूचना, महत्त्वाचे संपर्क क्रमांक या नियमित माहितीचा समावेश असतो. महानगरपालिका प्रशासनाला विश्वास वाटतो की, या सर्व माहितीचा अनुयायांना निश्चितच उपयोग होतो आणि महापरिनिर्वाण दिनाच्या व्यवस्थापनामध्ये त्यातून सुलभता येते.

या माहिती पुस्तिकेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांची छायाचित्रे यांच्या पलीकडे जावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणातील सारांश, त्यांनी स्वतः लिहिलेले लेख, त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी इतर मान्यवर, साहित्यिक, विचारवंत आदींनी लिहिलेले लेख यांचा समावेश मागील चार वर्षांपासून सातत्याने करण्यात येतो आहे. लाखोंच्या संख्येने अनुयायांपर्यंत ही पुस्तिका पोहाचत असल्याने, त्याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेगवेगळ्या पैलुंची महतीदेखील पोहोचावी, हा प्रामाणिक प्रयत्न यामागे आहे. त्यासाठी अगणित साहित्यातून विचारपूर्वक शोध घेवून, दरवर्षी एक विशिष्ट विषय निवडून त्याचा समावेश पुस्तिकेत केला जातो. यंदा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा' ही संकल्पना निवडली आहे. सर्व अनुयायांना ती भावेल, अशी आशा आहे.

महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन सुव्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी अनुयायांचे जे सहकार्य दरवर्षी लाभते, त्याचा विनयपूर्वक उल्लेख करुन आम्ही आभार मानतो. सर्व नागरी सेवा-सुविधांचा अनुयायांनी लाभ घ्यावा, आपले सहकार्य यंदा आणि यापुढेदेखील लाभावे, अशी नम्र विनंती महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करीत आहोत.

| | | |
|---|---|---|
| **रमाकांत बिरादार**<br>उप आयुक्त<br>( परिमंडळ - २) | **डॉ. अश्विनी जोशी**<br>अतिरिक्त महानगरपालिका<br>आयुक्त (शहर) | **डॉ. इ सिं चहल**<br>महानगरपालिका आयुक्त<br>तथा प्रशासक |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, परमपूज्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने सर्वप्रथम मी अभिवादन करतो.महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने मुंबईत चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येणाऱ्या लाखो अनुयायांना निरनिराळ्या नागरी सेवा-सुविधा पुरविण्याची महत्त्वाची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पार पाडली जाते. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदाचे कामकाज सांभाळताना सलग चौथ्या वर्षी या कार्यवाहीची धुरा सांभाळता आली, त्यातील दोन वर्षे प्रशासक या नात्याने योगदान देता आले, हे खरोखरच मी माझे भाग्य मानतो. मुंबई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विशेष नाते आहे. बाबासाहेबांचे वास्तव्य, शिक्षण, कारकीर्द व जीवनातील कित्येक महत्त्वाचे प्रसंग आणि चिरविश्रांती स्थान चैत्यभूमी या सगळ्यांची मुंबई साक्षीदार आहे. या मुंबईमध्ये खुद्द डॉ. बाबासाहेबांच्या कारणी जनसेवेची अनन्यसाधारण संधी प्रशासनात लाभणे, हे माझे भाग्य आहे.

कोविड कालावधीत अनुयायांना चैत्यभूमीवर येणे शक्य नव्हते. त्यावेळी प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांच्या सहाय्याने थेट प्रक्षेपण करत अनुयायांना चैत्यभूमीचे दर्शन घेवून अभिवादन करता येईल, अशी व्यवस्था बृहन्मुंबई महानगरपालिकेने केली होती. आता पुनश्च प्रत्यक्ष लाखोंचा जनसागर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींसमोर नतमस्तक होण्यासाठी येतो आहे. हे दोन्ही परस्परविरोधी प्रसंगदेखील मी अनुभवले आहेत. महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वतयारीप्रसंगी कित्येकदा या सर्व आठवणी नजरेसमोर उमटल्या. कोट्यवधी नागरिक जिथे राहतात, त्या मुंबईत महापरिनिर्वाण दिनी देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने जनसमुदाय येत असताना, त्यांच्या सेवा-सुविधांसाठी महाराष्ट्र शासन, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस, रेल्वे, बेस्ट यासमवेत सर्वच शासकीय प्राधिकरण आपसात समन्वयाने अहोरात्र कामकाज करतात. सर्वकाही सुरळीत पार पडते, त्याचे समाधान काही वेगळेच असते. अर्थात त्यासाठी अनुयायांकडून परम सहकार्य लाभते, त्याचाही याठिकाणी मी विनयपूर्वक उल्लेख करु इच्छितो. या सहकार्याबद्दल समस्त अनुयायांचे, संघटना व संस्था आदींचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण होवून ६६ वर्षांनंतरही कोट्यवधींचा जनसमुदाय त्यांना अभिवादन करण्यासाठी एकत्र येतो, हे जगासाठी लक्षवेधी आहे. विदेशातून आलेल्या शिष्टमंडळांना जेव्हा मुंबईतल्या कामकाजाची माहिती दिली जाते तेव्हा ते हमखास याविषयी चर्चा करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात केलेला संघर्ष, त्यांची अद्भूत कारकीर्द व विविधांगी पैलू याविषयी परदेशी मान्यवर भारावून बोलतात, त्यावेळी एक भारतीय म्हणून आणि एक प्रशासकीय अधिकारी म्हणून मला नितांत अभिमान वाटतो. फक्त भारतातच नव्हे तर विदेशामध्येही आदरणीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा, शिकवणीचा प्रसार झाला आहे, हे त्यातून स्पष्ट होते.

जगातील सर्वात सक्षम व बलाढ्य लोकशाही म्हणून आज भारताचे स्थान आहे. या लोकशाहीचा भरभक्कम पाया रोवणाऱ्या भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जग ओळखते तसे उपेक्षित, दीनदुबळ्या गरजू घटकांसाठी आयुष्य वेचणारा महामानव म्हणूनही त्यांची ख्याती आहे. मुळात जागतिक पातळीवरच्या समतेच्या लढ्यांमध्ये ज्या-ज्या थोर लोकांचे योगदान आहे, अशा निवडक व्यक्तींमध्ये त्यांची गणना केली जाते. हे सर्व काही करत असताना कायदेतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, पत्रकार अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी दूरदृष्टीने केलेल्या

कार्याचे आश्चर्य जगभरातील लोकांना वाटल्याशिवाय राहत नाही. एका आयुष्यात इतके सारे करता येणे, ही थोर महामानवाचीच कामगिरी असू शकते आणि म्हणूनच भारताबाहेर जगभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुसरण वाढले आहे. त्यांच्या विचारांचा आणि कार्यांचा जगभरात मोठ्या प्रमाणात अभ्यास केला जात आहे.

मुंबईत इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा व स्मारक उभारले जात आहे. देश-विदेशातून येणाऱ्या अनुयायांना प्रेरणादायी ठरेल, असे हे भव्यदिव्य स्मारक असणार आहे. आपल्या देशात सर्वत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे आहेत, त्यांचे नाव दिलेले मार्ग, रस्ते आहेत. त्यांच्या विचारांना अनुसरुन कार्य करणाऱ्या संस्थांनाही त्यांचे नाव दिले आहे. महामानवांच्या विचारांची ज्योत तेवत राहावी, त्यांच्या कार्याची पिढ्यानपिढ्या माहिती व्हावी, हाच यामागील मुख्य हेतू असतो. भारताचे सुपूत्र म्हणून आपल्या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी जो आदर आणि गौरव आहे तो जगातल्या इतर देशांमध्येही प्रकर्षाने दिसून येतो. भौगोलिक सीमा ओलांडून इतर देश, संस्कृतींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व, विचार, कार्याने ज्यारितीने प्रभावित केले आहे, ते भारावून टाकणारे आहे.

अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेतले होते. लंडनमध्येही त्यांनी उच्च शिक्षण प्राप्त केले होते. अमेरिकेत कोलंबिया विद्यापीठासह जगभरात अन्यत्र विविध ठिकाणीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुतळे उभारण्यात आलेले आहेत. लंडनमध्ये ते राहत असलेले घर महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने व प्रयत्नाने स्मारक म्हणून रुपांतरित करण्यात आले असून, तेथेही त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. जपानची बोधगया समजल्या जाणाऱ्या वाकायामा प्रांतातील कोयासान येथील विद्यापीठामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. मॉरिशस, कॅनडा, हंगेरी, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आदी विविध देशांमध्ये पुतळे, संस्था, संग्रहालये, वाचनालयांमध्ये पुस्तके आदींच्या रुपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृती जतन करण्यात आल्या आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात जन्म झाल्यानंतर तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थितीशी सातत्याने दोन हात करुन आपले लक्ष्य गाठताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक परिस्थितीचे सातत्याने निरीक्षण, अभ्यास, विश्लेषणदेखील केले होते. त्यांच्या अनेक भाषणांमधून याचे संदर्भ आढळतात. विद्वत्तेप्रमाणेच या निरीक्षण आणि विश्लेषणबुद्धीची त्यांना भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करताना अधिक मदत झाली. जगातील राज्यघटनांमध्ये जे जे चांगले आणि भारताच्या जडणघडणीला हातभार लावू शकेल, ते ते स्वीकारून त्याची भारताच्या गरजेनुसार संविधान मसुद्यामध्ये समाविष्ट करण्याची कसरत त्यांनी लीलया पेलली.

'जगात चिरकाल शांतता नांदण्याच्या वाटेत साम्राज्यलोभ, वर्णद्वेष आणि दारिद्र्य हे तीन प्रचंड अडथळे आहेत. राष्ट्राचे सामर्थ्य वाढविणे हा पहिल्या दोन अडचणींवरील तोडगा आहे.' असे दिनांक १० मे १९४३ रोजी मुंबईत केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. या दोन वाक्यांमध्येच बाबासाहेबांच्या जागतिक दृष्टिकोनाचा सार सामावलेला आहे. त्यांचा हा दृष्टिकोन जगाच्या नकाशावर अनेक देशांना भविष्यात सहाय्यकारी आणि प्रगतीकारक ठरेल.

**भारताच्या या थोर सुपूत्रास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विनम्र अभिवादन.**

**डॉ. इ सिं चहल**

महानगरपालिका आयुक्त
तथा प्रशासक



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१८९१ : महू, मध्य प्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).
१९०७ : मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण.
१९०८ : रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
१९१० : एन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
१९१२ : बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१९१३ : वडील सुभेदार रामजी यांचे निधन (२फेब्रुवारी).
१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती प्रदान केली (१ जून).
१९१३ : उच्च शिक्षणाकरीता न्यूयॉर्कला (अमेरिका) रवाना.
१९१५ : 'ॲन्शिएंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधासह एम. ए. ची पदवी उत्तीर्ण.
१९१६ : 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया : अ हिस्टॉरिकल अँड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.
१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.
१९१८ : सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).
१९२० : राजर्षी शाहू महाराज यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जाने.)
१९२० : माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद (१ मार्च).
१९२० : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद,नागपूर(१मे).
१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
१९२३ : 'डॉक्टर ऑफ सायन्स'ची पदवी बहाल.
१९२४ : 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई (२० जुलै).
१९२६ : 'राजरत्न' या मुलाचे निधन (जुलै).
१९२७ : कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड(१९ मार्च).
१९२७ : 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन (३ एप्रिल).
१९२७ : मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड.
१९२७ : 'समाज समता संघ' ची स्थापना (४ सप्टेंबर).
१९२७ : डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन (१२ नोव्हेंबर).
१९२७ : अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह (१३ नोव्हेंबर).
१९२७ : महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर).
१९२८ : मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक (जून).
१९२८ : 'समता' पाक्षिकाचा आरंभ (२९ जून).
१९२८ : 'सायमन कमिशन' पुढे साक्ष (२३ ऑक्टोबर).
१९२९ : अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण.
१९३० : काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ (३ मार्च).
१९३० : लंडन येथे आयोजित गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना (२ ऑक्टोबर).
१९३० : गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली (नोव्हेंबर).
१९३० : 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ (२४ नोव्हेंबर).
१९३१ : मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट (१४ ऑगस्ट).
१९३१ : अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध (८ ऑक्टोबर).
१९३१ : गांधी-आंबेडकर-पंचम जॉर्ज यांची भेट (२६ नोव्हेंबर).
१९३२ : पुणे करारावर स्वाक्षरी (२४ सप्टेंबर).
१९३५ : पत्नी रमाबाई यांचे निधन (२७ मे).
१९३५ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती (२ जून).
१९३५ : "मी जरी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, तरी हिंदू म्हणून मरणार नाही!" डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची येवला येथे धर्मांतराची घोषणा (१३ ऑक्टोबर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१९३६ : 'जातीप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित (मे).
१९३६ : 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई (३१ मे).
१९३६ : स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना (१५ ऑगस्ट).
१९३७ : मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ.आंबेडकर विजयी (१७ फेब्रुवारी ).
१९३७ : कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरीता मुंबई विधिमंडळात विधेयक मांडले (१७ सप्टेंबर).
१९३८ : पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण (४ जानेवारी).
१९३८ : मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (१२-१३ फेब्रुवारी ).
१९३८ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाचा राजीनामा (मे).
१९३८ : औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले (सप्टेंबर).
१९३८ : स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह (७ नोव्हेंबर).
१९३९ : महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद - काँग्रेसच्या शेतकरीविरोधी धोरणावर टीका (जानेवारी).
१९४० : सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट, मुंबई (२२ जून).
१९४० : 'थॉट्स ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
१९४२ : अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना (एप्रिल).
१९४२ : भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर (१९ जुलै).
१९४२ : मजूर मंत्री म्हणून निवड.
१९४३ : पुणे येथे विख्यात भाषण; 'रानडे, गांधी आणि जिन्ना' (१९ जानेवारी).
१९४५ : 'काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले' ग्रंथ प्रकाशित (जून ).
१९४६ : मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (२० जून).
१९४६ : 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रकाशित.
१९४६ : भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करू शकत नाही. संविधान सभेत भाषण (१७ डिसेंबर ).
१९४७ : भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश (ऑगस्ट ).
१९४७ : संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती (२९ ऑगस्ट ).
१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह (१५ एप्रिल).
१९४८ : 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित (ऑक्टोबर).
१९४८ : घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला (४ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण (२५ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीने घटना स्वीकार केली (२६ नोव्हेंबर).
१९५० : 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध (मे).
१९५० : कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित (२५ मे).
१९५० : औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन (१९ जून ).
१९५१ : लोकप्रतिनिधीत्व विधेयक लोकसभेपुढे मांडले (मे ).
१९५१ : 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (सप्टेंबर).
१९५१ : हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा (२७ सप्टेंबर).
१९५२ : प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव (जानेवारी).
१९५२ : राज्यसभेसाठी निवड (मार्च ).
१९५२ : कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी बहाल (५ जून ).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनप्रवास

१९५३ : उस्मानिया विद्यापीठातर्फे ( हैदराबाद), 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी बहाल (१२ जानेवारी ).

१९५४ : 'महात्मा फुले' या चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित (३० जानेवारी).

१९५४ : भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव (मे).

१९५४ : आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण (३ ऑक्टोबर).

१९५४ : माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले (२८ ऑक्टोबर ).

१९५४ : रंगून येथील तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित (डिसेंबर).

१९५५ : भारतीय बौद्ध महासभा स्थापित (४ मे ).

१९५६ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली (४ फेब्रुवारी).

१९५६ : 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा नरे पार्क, मुंबई येथे केली (२४ मे).

१९५६ : नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसमवेत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य, बांधवांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली (१४ ऑक्टोबर).

१९५६ : 'बौद्ध धम्म का स्वीकारला' याविषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण (१५ ऑक्टोबर).

१९५६ : चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बांधवांना धम्मदीक्षा दिली (१६ ऑक्टोबर).

१९५६ : काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' या विषयावर अभूतपूर्व भाषण दिले (२० नोव्हेंबर).


१९५६ : दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (०६ डिसेंबर).

१९५६ : मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार (७ डिसेंबर).




**कोल्हापूर शहरात दि. ९ डिसेंबर १९५० रोजी स्थापित करण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयात असताना बनविला गेलेला हा त्यांचा जगातील पहिला पुतळा आहे.**


# बाबासाहेबांचे तीन गुरू



तथागत गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

'' माझे आयुष्य तीन गुरू आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरू 'बुद्ध' होत. माझे दुसरे गुरू 'कबीर' आणि तिसरे गुरू म्हणजे 'जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत. पहिले दैवत 'विद्या', दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय'' (मुंबई, १९५४).

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

'' जातिभेदावर कुऱ्हाड घालून अस्पृश्यतेचे पाप मुळातच मारुन टाकणारा जर एखादा धर्मवीर आपल्या देशात अवतरला असेल तर तो एकटा गौतम बुद्धच होय.''




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान 'राजगृह', हिंदू कॉलनी, दादर

धम्मदीक्षा घेतल्यानंतर 'मी बौद्ध धम्मच का स्वीकारला?'
याचे जाहीर सभेत सविस्तर विवेचन करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर



ऑक्टोबर १९३५ मध्ये येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी " मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही!" अशी घोषणा केली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे लाखो अनुयायांसमवेत औपचारिकरीत्या बौद्ध धर्माचा स्वीकार केला. तलवार किंवा बंदुकीच्या धाकाशिवाय आणि धनसंपत्तीचे कोणतेही आमिष दाखविल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्मांतर झाल्याचे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात सापडणार नाही.

'' तुम्ही सर्वांनी-स्त्रीपुरुषांनी- खात्री बाळगली पाहिजे की तुमचा उद्धार करण्यास दुसरे कोणीही येणार नाही, किंवा तो मीही करणार नाही. जर मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करुन घेण्यास समर्थ व्हाल ''

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २२ प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारू पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इत:पर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.

# महामानवाचे महापरिनिर्वाण



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबर रोजी मुंबईत त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे १० तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दुःखाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. सुमारे दोन-तीन मैल लांबीची ही अंत्ययात्रा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (तेव्हाचा व्हिसेंट रोड), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी सुमारे सात तासांनंतर छत्रपती शिवाजी महाराज मैदान (तेव्हाचे शिवाजी पार्क) जवळील स्मशानभूमीवर पोहोचली. 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागराने महामानवाला अखेरचा निरोप दिला.



'' एखादा समाज बहुजन समाज आहे. एवढ्यावरच भागणार नाही तर तो जागृत, सुशिक्षित, स्वाभिमानी असेल तरच त्याचे सामर्थ्य वाढेल ''



घटना समितीने नेमलेल्या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा अंतिम मसुदा हा घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केला, तो २५ नोव्हेंबर १९४९ चा ऐतिहासिक क्षण.

‘‘ नवीन हक्क, मोठ्या नोकऱ्या वगैरे मिळवायच्या, तर त्याला स्वतःची लायकी लागत असते. ती लायकी वाढविण्याचे मुख्य काम विद्यार्थी दशेत तुम्ही करीत असताना तुम्ही इतर कोणत्याही चळवळीत पडणे चुकीचे होईल ’’

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे
स्वातंत्र्य ; दर्जाची व संधीची समानता ;
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन ;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक
सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

'' हक्कासाठी आपला झगडा पुढे चालू ठेवणे आवश्यकच आहे आणि याकरिता आपले आपसातले मतभेद अंतस्थ कलह विसरुन जाऊन एकजुटीने संघटीतपणे आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करणे हेच आपले आजचे कार्य होय.''



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील निवासस्थान



अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ मॅसेच्युएट्स परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा.



अमेरिकेतील अँमहेर्स्ट येथील डब्ल्यू. ई. बी डुबॉईस वाचनालयाच्या प्रांगणातील
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटीकल सायन्स'च्या प्रांगणात बसवलेला अर्धपुतळा. इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटीकल सायन्समध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२१-२२ दरम्यान 'डॉक्टर ऑफ सायन्स'चे शिक्षण घेतले होते.




इंग्लंडच्या वॉल्व्हेरहॅम्प्टन येथे स्थापित करण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा.



उत्तर अमेरिकेच्या ॲक्कॉकिक शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १९ फूट उंच पुतळा उभारण्यात आला आहे. 'स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी' असे नाव देण्यात आलेल्या या पुतळ्याचे लोकार्पण १४ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हंगेरीच्या साजोकाझ्झा येथे १४ एप्रिल २०१६ रोजी बसविण्यात आलेला अर्धपुतळा.

'' मनुष्याच्या अंगी जितके नैतिक बळ अधिक असेल तितका त्याचा आत्मविश्वास वाढत जाऊन पराजयातूनही त्याला शेवटी सन्मानाचे यश मिळविता येते ''



ऑस्ट्रेलियातील वेस्टर्न सिडनी युनिव्हर्सिटीतील 'स्कूल ऑफ लॉ' या विद्याशाखेच्या प्रांगणात दिनांक १५ जुलै २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला.



जपानच्या वाकायामा प्रांतातील कोयासान विद्यापीठामध्ये २०१५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. कोयासान विद्यापीठाचा १२०० वा स्थापना दिन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने हा पुतळा उभारण्यात आला आहे.



दक्षिण आफ्रिकेच्या निरॉक्स स्कल्प्चर पार्कमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे उभारण्यात आले आहेत. 'फोर्थ वर्ल्ड' या संकल्पनेअंतर्गत या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्व आणि पश्चिम दिशाभिमूख दोन पुतळे असून दोन पुतळ्यांची जागा रिक्त ठेवण्यात आली आहे.



कोलंबिया विद्यापीठातील लेहमन लायब्ररीच्या प्रांगणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे. कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण घेतले असून १९१६ मध्ये त्यांनी सादर केलेल्या 'नॅशनल डिव्हिडंड ऑफ इंडिया: अ हिस्टॉरिकल अँड ॲनालिटीकल स्टडी' या विषयावरील प्रबंधासाठी कोलंबिया विद्यापीठाने त्यांना पीएच. डी. पदवी बहाल केली होती.

' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जागतिक पाऊलखुणा ' या सदरातील सर्व छायाचित्रे संबंधित विद्यापीठ, संस्था, अभ्यासक यांच्याकडून प्राप्त करण्यात आली आहेत. या सहकार्यासाठी संबंधित सर्व विद्यापीठ, संस्था प्रशासनाचे तसेच अभ्यासकांचे विशेष आभार.



भारतीय घटना समितीच्या सन्माननीय सदस्यांसमवेत घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मान्यवर.



भारतीय घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समवेत मसुदा समितीचे सदस्य व कार्यालयीन अधिकारी (ऑगस्ट १९४७).



घटना समितीची बैठक व चर्चा सुरु असताना मान्यवर सभासदांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



'' नुसत्या जगण्यात कवडीची किंमत नाही. मनुष्य इज्जतीने जगतो की नाही याला महत्त्व आहे. ''



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार

# “मुंबई महाराष्ट्रातच का राहिली पाहिजे ?”
## - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**भाषावार प्रांतरचना करताना मुंबई महाराष्ट्रात समाविष्ट केली जाऊ नये अशा प्रकारचा युक्तिवाद तत्कालिन विचारवंतांनी (विशेषतः प्रा. सी. एन. वकील, प्रा. दातवाला आणि प्रा. घीवाला यांनी) केला होता. यावर मुंबई ही महाराष्ट्रातच का राहिली पाहिजे ? याचे सर्वात प्रभावी आणि परखड विवेचन केले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी !**

(संदर्भ : ‘महाराष्ट्र- एक भाषिक राज्य’, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी
१९४८ साली राज्य पुनर्रचना आयोगापुढे सादर केलेले निवेदन).

**विरोधकांनी उपस्थित केलेले मुद्दे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सडेतोड आणि तर्कसंगत उत्तरे यांचा गोषवारा खालीलप्रमाणेः**

**आक्षेप- “ मुंबई हा महाराष्ट्राचा भाग कधीच नव्हता.”**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तरः**

“महाराष्ट्र प्रांताच्या संदर्भात मुंबईचे स्थान लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रांताची रचना झाल्यास तो आकाराने त्रिकोणी असेल. या त्रिकोणाची एक बाजू ही उत्तरेकडील दमण आणि दक्षिणेकडील कारवार यांमधील भारताची पश्चिम किनारपट्टी आहे. मुंबई शहर हे दमण आणि कारवारच्या मध्यावर पडते. गुजरात प्रांत दमणपासून पुढे उत्तरेकडे पसरतो. कन्नड प्रांत कारवारपासून पुढे दक्षिणेकडे पसरतो... जर दमण आणि कारवारमधील अखंड प्रदेश भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचा भाग ठरतो, तर फक्त मुंबईच महाराष्ट्राचा भाग का बरे होऊ शकत नाही ? ही निर्विवाद नैसर्गिक वस्तुस्थिती आहे. भूगोलाने मुंबईला महाराष्ट्राचा हिस्सा ठरविले आहे. जे या नैसर्गिक तथ्यालाच आव्हान देऊ इच्छितात त्यांना ते करू द्यावे. मात्र निःपक्षपाती बुद्धी याच निष्कर्षात येते की, मुंबई महाराष्ट्राचीच आहे.”

**आक्षेप : “ मुंबई कधीच मराठा साम्राज्याचा भाग नव्हता .”**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तरः**

“मराठ्यांनी मुंबईला आपल्या साम्राज्याचा एक भाग बनविण्याची पर्वा केली नाही, ही बाब भौगोलिकतेपासून काढलेल्या निष्कर्षाच्या वैधतेवर कोणताही परिणाम करीत नाही. मराठ्यांनी मुंबई जिंकून घेण्याविषयी गांभीर्य दाखविले नाही यावरुन मुंबई महाराष्ट्राचा भाग नाही, असे सिद्ध होत नाही. याचा अर्थ एवढाच होतो की, मराठेशाही ही भूमीवरील सत्ता होती आणि म्हणूनच त्यांनी त्यांचे बळ बंदर जिंकून घेण्यासाठी वापरले नाही.”

**आक्षेप: "मुंबई शहराच्या लोकसंख्येत मराठी भाषक मेजॉरिटीने नाहीत."**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर:**

"भारताच्या सर्व भागांतील लोकांना जर मुंबईत येण्याची आणि स्थायिक होण्याची मुभा आहे तर त्याची शिक्षा महाराष्ट्रीयांनी का भोगावी? हा त्यांचा दोष नाही. म्हणूनच आजच्या लोकसंख्येची वस्तुस्थिती मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्यासाठी आधारभूत ठरू शकत नाही."

**आक्षेप: "गुजराती हे मुंबईचे जुने रहिवाशी आहेत."**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर:**

"गुजराती मंडळी आपणहून मुंबईत आली नाहीत. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना व्यापारी अडते दलाल म्हणून काम करण्यासाठी मुंबईत आणले गेले. कारण ईस्ट इंडिया कंपनीच्या ज्या अधिकाऱ्याची पहिली फॅक्टरी सुरतमध्ये होती, त्यांना त्यांचा धंदा चालविण्यासाठी, दलाल म्हणून सुरती बनियांची गरज होती. गुजरात्यांच्या मुंबई वास्तव्याचे हे स्पष्टीकरण आहे. दुसरे असे की, अन्य व्यापाऱ्याशी तुल्यबळ स्पर्धा करीत स्वतंत्र व्यापार करण्यासाठी गुजराती मुंबईत आले नाहीत. ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना दिलेल्या काही विशेष व्यापारी हक्कांचा फायदा घेऊन आलेली ही मंडळी होती."

**आक्षेप: "मुंबई हे महाराष्ट्राबाहेरील फार मोठ्या प्रदेशाचे व्यापारी केंद्र आहे म्हणून मुंबईवर महाराष्ट्राला हक्क सांगता येणार नाही. मुंबई ही पूर्ण देशाची आहे."**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर:**

"मुंबई संपूर्ण भारताची बाजारपेठ आहे हे स्वीकारता येईल. मात्र, त्यामुळे महाराष्ट्र मुंबईवर हक्क सांगू शकत नाही, हे म्हणणे समजून घेणे अवघड आहे. कोणतेही बंदर ते ज्या देशाचे असते त्यापलीकडे अधिक मोठ्या परिसराची सेवा बजावते. त्या बळावर कुणी असे म्हणू शकत नाही की, ज्या प्रदेशात ते बंदर आहे तो प्रदेश त्या बंदरावर आपला भूभाग म्हणून हक्क सांगू शकत नाही... तर मग मुंबईवर हक्क सांगण्यापासून महाराष्ट्राला का रोखता? केवळ एवढ्यासाठीच की बंदर म्हणून मुंबई महाराष्ट्राखेरीज इतरही प्रांतांची सेवा बजावते? आता महाराष्ट्रेतरांसाठी हे बंदर बंद करण्याचा अधिकार महाराष्ट्राला असता तर गोष्ट वेगळी. असा अधिकार राज्यघटनेनुसार असणार नाही. परिणामतः मुंबई महाराष्ट्रात विलीन करण्याने महाराष्ट्रेतरांनी या बंदराचा वापर करण्यावर कोणताही परिणाम होणार नाही."

**आक्षेप: "मुंबईतील गुजराती भाषिकांनी मुंबईचा व्यापार आणि उद्योगधंदा उभा केला. महाराष्ट्रीय केवळ कारकून आणि हमाल राहिले. महाराष्ट्रीय नावाखाली येणाऱ्या या कामगारवर्गाच्या राजकीय वर्चस्वाखाली व्यापार-उद्योगाच्या मालकाना राहू द्यावे हे चुकीचे ठरेल."**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर:**

"मुंबईचा व्यापार-उद्योग कोणी उभा केला, याबाबत फार मोठया संशोधनाची गरज नाही. मुंबईचा व्यापार-उद्योग गुजरात्यांकडून उभारला गेला या म्हणण्याला खरेतर काहीच आधार नाही...तो यूरोपियनांकडून उभारला गेला, गुजरात्यांकडून नाही. गुजराती हे केवळ व्यापारी होते. हे उद्योगपती असण्यापेक्षा वेगळे आहे."

"व्यापार-उदीम गुजरात्यांच्या मालकीचा आहे हा युक्तिवाद मांडून मुंबई महाराष्ट्रात विलीन करण्याची मागणी फेटाळता येणार नाही. गहाण ठेवून घेतलेल्या जमिनीवर कायमस्वरुपी बांधकाम केले आहे, अशी सबब पुढे करून गहाण ठेवणाऱ्याने जमिनीच्या परताव्यासाठी केलेली मागणी, गहाण ठेवून घेणारा धुडकावून लावू शकत नाही"

“बिहारमध्ये ज्या जमिनीत कोळसा सापडला ती जमीन बिहारी लोकांच्या मालकीची आहे. कोळशाचे मालक मात्र लोक गुजराती, काठेवाडी आणि यूरोपियन आहेत. तेथील बिहारी लोक गुजराती आणि काठेवाडी कोळसा मालकांबाबत भेदाभेद करण्याची शक्यता नाही काय? या गुजराती आणि काठेवाडी कोळसा उद्योजकांच्या हितार्थ बिहारचे कोळसा क्षेत्र बिहार प्रांतापासून वेगळे करून स्वतंत्र प्रांत स्थापणार काय?”

**आक्षेप: “महाराष्ट्राला मुंबई हवी, कारण मुंबईच्या भांडवली नफ्यावर महाराष्ट्राला गुजराण करावयाची आहे.”**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उत्तर:**

“महाराष्ट्रीयांना मुंबई हवी कारण ते मुंबईच्या नफ्यावर जगू इच्छितात हे म्हणणे चुकीचे तर आहेच, पण खरे म्हणजे हेतूबद्दल प्रश्न उपस्थित करणारे आहे. अशा काही हेतूंनी महाराष्ट्रीय प्रेरित आहेत का, हे मला ठाऊक नाही. हा काही व्यापारी समाज नाही...पैसा त्यांचा ईश्वर कधीच नव्हता. हा त्यांच्या संस्कृतीचा भाग नव्हे. म्हणूनच तर त्यांनी महाराष्ट्राबाहेरील इतर समाजांना महाराष्ट्राच्या व्यापार-उदिमाची मक्तेदारी घेण्यासाठी येऊ दिले... परंतु असा काही हेतू महाराष्ट्रीयांच्या मनात असेल, असे जरी गृहित धरले तर त्यांचे काय चुकले? मुंबईच्या नफ्यावर त्यांचा अधिक हक्क आहे, हे स्पष्टच आहे, कारण मुंबईचा व्यापार-उदिम उभा करण्यासाठी अन्य प्रांतातील लोकांपेक्षा मजुरांचा पुरवठा करण्याबाबत त्यांचा सहभाग मोठा आहे व मोठा राहील...

“दुसरे असे, मुंबईचा नफा केवळ महाराष्ट्राकडून वापरला जात नाही तर संपूर्ण भारताकडून वापरला जातो. इन्कम टॅक्स, सुपर टॅक्स इत्यादी म्हणून जी संपत्ती मुंबई केंद्र सरकारला देते, ती केंद्र सरकारकडून संपूर्ण भारतासाठी वापरली जाते आणि सर्व प्रांतांना त्यातील वाटा मिळतो. मुंबईचा नफा संयुक्त प्रांत, बिहार, आसाम, ओरिसा, पश्चिम बंगाल, पूर्व बंगाल आणि मद्रासने गिळंकृत केला तर ते प्रा. वकीलांना चालतो. त्यांची हरकत कशाला तर महाराष्ट्राला त्यातील काही हिस्सा मिळणे याला. हा युक्तिवाद नव्हे. त्यांच्या महाराष्ट्रद्वेषाचे दर्शन आहे...”

**त्याच निवेदनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात :**

“मुंबईप्रमाणेच कलकत्ता ही संपूर्ण पूर्व भारताची बाजारपेठ आहे. मुंबईतील महाराष्ट्रीयांप्रमाणेच कलकत्त्यात बंगाली अल्पसंख्याक आहेत. मुंबईतील महाराष्ट्रीयांप्रमाणेच कलकत्त्यातील बंगालीही व्यापार-उदिमाचे मालक नाहीत. कलकत्त्यातील बंगाल्यांची स्थिती तर मुंबईतील महाराष्ट्रीयांपेक्षा डळमळीत आहे. उदाहरणार्थ- महाराष्ट्रीय किमान असा दावा करू शकतात की, त्यांनी मुंबईतील व्यापार-उद्योगांना भांडवल पुरवले नसले तरी कामगार पुरवले आहेत. बंगाली हेही म्हणू शकत नाहीत. मुंबई महाराष्ट्रापासून विलग करण्याचा आग्रही युक्तिवाद जर (राज्य पुनर्रचना) आयोगाने स्वीकारला तर त्याचबरोबर आयोगाला कलकत्ता पश्चिम बंगालपासून वेगळा करावा, अशी शिफारसही करावी लागेल. कारण, ज्या कारणासाठी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी केली जाऊ शकते तेच कारण अस्तित्वात असताना कलकत्ता मात्र पश्चिम बंगालपासून वेगळा का केला जात नाही, असा समर्पक प्रश्न विचारला जाऊ शकतो...“महाराष्ट्र आणि मुंबई केवळ परस्परावलंबीच नाहीत तर अभिन्न आणि अतूट आहेत. त्यांचे विभाजन दोहोंसाठी घातक ठरू शकेल. मुंबईसाठीच्या वीजपाण्याचा स्त्रोत महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्राचा बुद्धिजीवी वर्ग मुंबईत राहतो. महाराष्ट्रातून मुंबई वेगळी काढणे म्हणजे मुंबईचे आर्थिक जीवन डळमळीत करणे होय...”




# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय विचार

प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार, सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे... म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा. (महाबळेश्वर, ६ मे, १९२९)

भाषा, प्रांतभेद, संस्कृती वगैरे भेदभाव मी कधीच पाळू इच्छित नाही. प्रथम हिंदी, नंतर हिंदू किंवा मुसलमान हेही तत्त्व मला पटत नाही. सर्वांनी प्रथम भारतीय, शेवटी भारतीय, भारतीयाच्या पलीकडे काही नको हीच भूमिका घ्यावी. (मुंबई, १ एप्रिल, १९३८)

माझे बहुसंख्य हिंदूंना एवढेच सांगणे आहे की, आता तुम्ही बहुसंख्य असल्यामुळे जी सत्ता तुमच्या हाती येणार आहे तिचा न्याय्य व उदार बुद्धीने उपयोग करा. भारत देशाच्या प्रगतीची वाढ जर खुंटली, तर त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील. (नागपूर, ३ मे, १९३६)

तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रशिक्षणाविना देशाच्या विकासाची कोणतीही योजना पूर्णत्वाला जाणार नाही.
(कलकत्ता, २४ ऑगस्ट, १९४४)

ज्याला मत असेल त्याने त्या मताचा अमौलिक वस्तूसारखा उपयोग केला पाहिजे. मत म्हणजे ईश्वराने दिलेला 'संजीवनी मंत्र' आहे. त्याचा उपयोग केला तरच आपले संरक्षण होईल. स्वाभिमानी जीवनाचा तो एक तरणोपाय आहे, त्याची जोपासना करा. (सातारा, १५ फेब्रुवारी, १९४६)

संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही. तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रामाणिक असतील, तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही.
(संविधान सभा, दिल्ली, २५ नोव्हेंबर, १९४९)

संसदेत असलेल्या आपण सर्वांनी जबाबदारीचे भान ठेवले नाही, जनतेच्या हिताची आणि कल्याणाची धुरा आपल्या खांद्यावर घेण्याची तत्परता दाखविली नाही तर एक दिवस असा येईल, की संसदेविषयी आत्यंतिक घृणा निर्माण होईल, याबाबत माझ्या मनात काहीही संदेह नाही.
(राज्यसभा, नवी दिल्ली, १९ मे, १९५२)



तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथे उभारण्यात आलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळा. १२५ फूट उंचीचा हा पुतळा १०० टन स्टील आणि १०० टन तांबे वापरुन बनविण्यात आला आहे.

# लोकशाहीच्या रक्षणासाठी...

२६ जानेवारी, १९५० रोजी भारत एक प्रजासत्ताक देश होईल तो या अर्थाने की, भारतात त्या दिवसापासून लोकांचे, लोकांनी बनविलेले आणि लोकांसाठी असलेले सरकार प्राप्त होईल...

भारताला 'लोकशाही' म्हणजे काय हे माहीत नव्हते असे नाही. एक काळ असा होता की, भारत हा गणराज्यांनी भरगच्च होता. भारताला संसद किंवा संसदीय प्रणाली माहीत नव्हती असेही नाही...

ही प्रजासत्ताक पद्धती भारताने गमावली. पुन्हा दुसऱ्यांदा तो ती गमवणार काय ?... भारतासारख्या देशात हे सहज शक्य आहे की... नव्यानेच जन्माला आलेली लोकशाही आपले बाह्य स्वरुप सांभाळेल परंतु प्रत्यक्षात ती हुकूमशाहीला स्थान देईल. प्रचंड बहुमत असले तर दुसरी शक्यता वास्तवात येण्याचा मोठा धोका आहे.

केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल तर त्यासाठी आपण काय करावयाला हवे ? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण सांविधानिक मार्गाचीच कास धरली पाहिजे. याचा अर्थ हा की, क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णतः दूर सारला पाहिजे. याचा अर्थ कायदेभंग, असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे... हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारू तेवढे ते आपल्या हिताचे होईल. दुसरी महत्त्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल... "लोकांनी आपले स्वातंत्र्य, कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये..." इतर देशांच्या तुलनेत भारताला हा सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल ती किंवा विभूति-पूजा ही जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात दिसणार नाही इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल, परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एक सामाजिक लोकशाहीतसुद्धा परिवर्तन करावयाला हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? तो एक जीवनमार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो.

(संविधान सभा, दिल्ली, २५ नोव्हेंबर, १९४९).




# स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी ...

२६ जानेवारी, १९५० रोजी भारत एक प्रजासत्ताक होईल. त्याच्या स्वातंत्र्याचे काय होईल ? तो आपले स्वातंत्र्य अबाधित ठेवील की पुन्हा गमावून बसेल, हा विचार माझ्या मनात प्रथम उभा राहतो. असे नाही की भारत हा यापूर्वी कधीही स्वतंत्र नव्हता. मुद्दा हा आहे की त्याने असलेले स्वातंत्र्य एकदा गमावले आहे. तो पुन्हा दुसऱ्यांदा ते गमावील का ? भवितव्याबाबतचा हाच विचार मला सर्वाधिक चिंताग्रस्त करतो. भूतकाळात भारताने आपले स्वातंत्र्य काही लोकांच्या बेईमानी आणि विश्वासघातामुळे गमावले ही वास्तविकता मला अधिक अस्वस्थ करते...

जातींच्या आणि संप्रदायांच्या स्वरुपातील आपल्या जुन्या शत्रूंसोबतच भिन्न आणि परस्परविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांचीही भर पडणार आहे. ह्या वास्तवाच्या जाणिवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्त्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्त्वप्रणालीला मोठे मानतील ? मला माहीत नाही. परंतु एवढे मात्र निश्चित की जर पक्षांनी स्वतःच्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले, तर आपले स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही आणि कदाचित कायमचे घालविले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हावयाला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केलाच पाहिजे.

(संविधान सभा, दिल्ली, २५ नोव्हेंबर, १९४९).

(संदर्भः 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार' या सदरातील सर्व लेख
डॉ. नरेंद्र जाधव लिखित आणि संपादित 'युगप्रवर्तक महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर'
या बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या कॉफी टेबल बुकमधून पुनर्मुद्रित.)



BHIMRAO R. AMBEDKAR
M.A., Ph.D., D.Sc.
BARRISTER-AT-LAW

26, Alipore Road,
Delhi,
the 24th February '52.

Dear Mr. Grayson Kirk,

I am indeed very grateful to you for your letter of January 30, 1952, asking for my permission to propose my name to the Trustees of Columbia University for conferment upon me the degree of Doctor of Laws, honoris causa. I count this a great honour and you may propose my name.

May I take the liberty to mention that my journey to and fro by air and stay will cost me nearly Rs.15,000/-. Could you suggest some means by which I can recoup this expenditure, for instance, by way of public lectures on subjects with which I am fully conversant and which would be of interest to the American people for example, on Indian Constitution, Buddhism, Caste System in India, etc.

I shall be grateful if you could pay this matter your as early attention as is most convenient to you.

With kindest regards,

Sincerely yours,

B. R. Ambedkar

(B. R. AMBEDKAR)

Grayson Kirk, Esq.,
Vice President & Provost,
Columbia University,
NEW YORK.


कोलंबिया विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ लॉ' पदवी स्वीकारण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आमंत्रित केले होते. तेथे जाण्यासाठी येणारा प्रवास खर्च १५००० रुपये इतका होता. या खर्चाची तजवीज करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दि. २४ फेब्रुवारी १९५२ रोजी कोलंबिया विद्यापीठाचे उपाध्यक्ष ग्रायसॉन किर्क यांना पत्र लिहिले की, विद्यापीठात माझ्या जाहीर व्याख्यानाचे आयोजन करावे आणि त्या मोबदल्यातून प्रवासाच्या खर्चाचे नियोजन करावे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठास 'भारतीय संविधान', 'बुद्धिझम' आणि 'भारतातील जातीप्रथा' हे तीन विषय सुचविले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठाला लिहिलेले हे पत्र.

'' लोकांच्या दारिद्र्याचे कारण उत्पादनातील कमतरता हे आहे आणि
जे उत्पादन होते त्याचीही समान वाटणी होत नाही. ''



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बृहन्मुंबई महानगरपालिका


बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय
हरित मुंबई
सुंदर मुंबई






डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी





बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृहातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा

# मुंबई म्युनिसिपालिटीतले लोकप्रतिनिधी

**महानगरपालिकेत निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या कर्तव्यासंबंधाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत'च्या दि. १-३-१९२९ च्या अंकात व्यक्त केलेले विचार.**

थोड्या दिवसांपूर्वी मुंबई म्युनिसिपालिटीतले शहराच्या वेगवेगळ्या वार्डाचे प्रतिनिधी निवडण्यात आले. दरमहा दहा रुपये किंवा त्यापेक्षा अधिक घरभाडे देणाऱ्या लोकांना मताधिकार मिळाल्यापासून साधारण लोकसमुदायामुळे म्युनिसिपालिटीतल्या लोकप्रतिनिधींच्या कर्तव्यसंबंधाने थोडीबहुत चर्चा होऊ लागली आहे. खरे पाहिले असता म्युनिसिपालिटीच्या कारभारसंबंधाने श्रीमंत लोकांपेक्षा मध्यम व गरीब स्थितीतल्या लोकांनाच अधिक अगत्य वाटले पाहिजे. मध्यम व गरीब वर्गातल्या लोकांच्या जीविताचा आणि म्युनिसिपालिटीचा अधिक संबंध आहे.

स्वच्छता, आरोग्यरक्षण, औषधोपचाराची व्यवस्था, पाणीपुरवठा, प्राथमिक शिक्षण, घरांची रचना, खेळण्याच्या व फिरण्याच्या सार्वजनिक जागा वगैरे कामे म्युनिसिपालिटीतल्या कार्यक्षेत्रात येतात. श्रीमंत लोकांना बऱ्याचशा गोष्टींकरिता म्युनिसिपालिटीवर अवलंबून राहावे लागत नाही. मलबार हिल, खंबाला हिल, पेडर रोड अशासारख्या हवेशीर ठिकाणी मोठमोठ्या बंगल्यात राहणाऱ्या लोकांना स्वतःच्या सर्व सोयी करुन घेता येतात. साफसफाई, स्वच्छता ठेवण्याची साधने त्यांना पैशामुळे उपलब्ध होतात. औषधोपचाराची व्यवस्था मोठमोठ्या डॉक्टरांना त्यांची जबर फी देऊन सधन लोकांस करुन घेता येते. प्राथमिक शिक्षणासाठी त्यांच्या मुलांवर कोणी सक्ती करावयास नको असते. आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी हवा तितका पैसा खर्च करणे त्यांना शक्य असते. त्यांना खेळण्यासाठी बंगल्याच्या आवारात किंवा क्लबमध्ये भरपूर जागा मिळू शकते आणि हवा खाण्याच्या जागा कितीही लांब असल्या तरी ते मोटारीतून, गाडीतून बसून तेथे सहज जाऊ शकतात.

उलटपक्षी शहराच्या गचाळ भागात चाळीमधील लहान लहान खोल्यात राहणाऱ्या मध्यम गरीब स्थितीतील लोकांना स्वतःच्या सोयी स्वतः करणे शक्य नसते. त्यांचे जीवित सुखावह व्हावे असे वाटत असेल तर म्युनिसिपालिटीसारख्या सार्वजनिक संस्थांनीच त्यांच्या सुखसोयीकडे लक्ष दिले पाहिजे, परदुःखाने दुःखित होणारे लोक जगात केव्हाही विराळाच असावयाचे म्हणून म्युनिसिपालिटीचा कारभार मध्यम व गरीब वर्गाच्या प्रतिनिधींच्या तंत्रानेच चालला पाहिजे. म्युनिसिपालिटीमध्ये बहुमत मध्यम व गरीब वर्गातल्या लोकांच्याच प्रतिनिधींचे असले पाहिजे हे उघड होय. गरिबांची दुःखे गरिबांनाच चांगल्या रीतीने ठाऊक असतात. कदाचित स्वतःची स्थिती गरीबीची नसली, तरी गरिबांच्या सुख- दुःखाची खऱ्या लोकप्रतिनिधींना माहिती असली पाहिजे आणि गरिबांविषयी सहानुभूती वाटली पाहिजे आणि गरिबांची बाजू कार्पोरेशनमध्ये मांडून गरिबांचे हित त्यांना साधता आले पाहिजे.

म्युनिसिपल कार्पोरेशनमध्ये निवडून येण्याकरिता जे उमेदवार उभे राहतात, त्यांची मते मिळविण्यासाठी मोठी धडपड चालते. आजकाल मुंबई म्युनिसिपालिटीत निवडून येणे साधारण स्थितीतल्या उमेदवारांना कठीण झाले आहे. मते मिळविण्यासाठी बराचसा खर्च करावा लागतो. श्रीमंत उमेदवार मते विकत घ्यावयास सुद्धा तयार असतात. परंतु मते विकत घ्यावयाची नसली तरी ती मिळविण्याकरिता जे प्रयत्न करावे लागतात ते खर्चाचे असतात. कार्पोरेशनमध्ये निवडून आल्यावर वेगवेगळ्या लटपटी करुन ज्यांना स्वतःचा काही आर्थिक फायदा करुन घ्यावयाचा नसतो अशांना कार्पोरेशनमध्ये निवडून येणे म्हणजे गाठचे खाऊन शेठची नोकरी करण्यासारखेच होते. अर्थात कार्पोरेशनमध्ये जाऊन लोकसेवा करण्याची लायकी अंगी असतानाही साधारण स्थितीतले लोक उमेदवार म्हणून उभे रहावयास धजत नाहीत. उलटपक्षी अंगी म्हणण्यासारखी काही लायकी नसतानाही कित्येक लोक पैशाच्या जोरावर मानासाठी हपापून उमेदवार म्हणून उभे राहतात. म्युनिसिपल कार्पोरेशनमध्ये लोकहित साधण्याचे काम करण्याला जे गुण आवश्यक असतात ते

लायकच असतात असे नाही. किंबहुना नालायक पण यशस्वी उमेदवारांचीच संख्या नेहमी बरीच मोठी असल्याचे दिसून येते.

मुंबई म्युनिसिपालिटीत वेगवेगळे पक्ष, त्यांची वेगवेगळी धोरणे व वेगवेगळे कार्यक्रम नाहीत म्हटले तरी चालेल. नावाला काही पक्ष आहेत. परंतु त्यात तत्त्वाचा भाग फारच थोडा असून निवडणुकीच्या वेळी तर मतदारांपुढे ते पक्ष योग्यरितीने मुळीच मांडले जात नाहीत. खाजगी प्रयत्नांनीच मते मिळविण्यात येतात. गेल्या निवडणुकीत जाहीर सभांच्या द्वारे मतदारांची मने वळविण्याचे प्रयत्न किती थोडे झाले ते मुंबई शहरातल्या लोकांना ठाऊकच आहे. पक्ष धोरण, कार्यक्रम, जाहीर सभा, जाहीर आश्वासने यांच्या अभावी मतदारांना नागरिकत्वाची कर्तव्ये, हक्क जबाबदारी यांच्या संबंधाने जे शिक्षण मिळणे अशक्य आहे ते मिळत नाहीच. परंतु मतदारांची दिशाभूल होऊन कसलेही रद्दी उमेदवार निवडून येऊ शकतात. कित्येक लोक तर मुंबईच्या म्युनिसिपल कार्पोरेशनमध्ये कायमचे वतनदार बनलेले आहेत. ते गरीब लोकांच्या हिताच्या आड येणारे असोत, पुच्छ प्रगतीच्या धोरणाचे पुरस्कर्ते असोत, केवळ माना हलविणारे नंदीबैल असोत, कधी तोंड उघडणारे मुकस्तंभ असोत अथवा कार्पोरेशन हॉलमध्ये वर्षासहामहिन्यातून तोंड दाखविणारे धुमकेतू असोत दरखेपेला ते नेहमी निवडून यावयाचेच! वर सांगितलेल्या प्रकारचे काही सभासद सरकारने नेमलेले असतात. तथापि, आम्हाला त्यांच्याबद्दल तेवढे आश्चर्य वाटत नाही. परंतु वार्डाच्या निवडणुकीतूनही तसले लोक पुनः पुनः निवडून येऊ शकतात हीच विशेष आश्चर्याची व खेदाची गोष्ट समजली पाहिजे. इकडील मतदारांमध्ये अद्यापि आपल्यावरील जबाबदारीची जाणीव व्हावी तशी उत्पन्न झालेली नाही याचीच ही साक्ष होय.

बऱ्याचशा निवडणुकी जातीभेदाच्या तत्त्वावरच होत असतात. ज्या उमेदवाराच्या जातीच्या मतदारांची संख्या फार लहान असेल तो खरोखरच नावाजलेला व सर्व शहरात अतिशय लोकप्रिय असा असल्याखेरीज अथवा पगारी एजंट ठेवून मते विकत घेण्याची ऐपत असल्याखेरीज त्याला निवडणुकीत यशस्वी होणे शक्य नाही. मतदारांचा ओढा स्वाभाविकपणे आपल्या जातीच्या उमेदवाराकडे असतो. आपल्या जातीचा प्रतिनिधी म्युनिसिपालिटीत बसणे हे आपल्या जातीला एक भूषण आहे असे पुष्कळांना वाटते. जात्याभिमानापुढे उमेदवाराच्या लायकी नालायकीचा विचार फारच थोड्या लोकांच्या मनात येतो. जातीभेदाचे बंड माजविणाऱ्या उमेदवारांना उदारमतवादी उमेदवारापेक्षा अधिक मते मिळतात आणि उदारमतवादी उमेदवार निवडणुकीत पडतातही.

हल्लीच्या मुंबई शहरातील कामगार वर्गाचे चार प्रतिनिधी घेण्याची मुंबई म्युनिसिपल ॲक्टात दुरुस्ती होऊन व्यवस्था झालेली आहे. कामगार संघातून एक मतदार मंडळ(Electoral college) तयार करण्यात येते व त्या मंडळाने हे चार प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असतात. तशा प्रकारची व्यवस्था बहिष्कृत वर्गाच्या बाबतीत होईल. तरच त्या वर्गाचे प्रतिनिधी निवडून येण्याची आशा आहे. किंवा हल्ली शहराचे सात वार्ड केले आहेत व प्रत्येक वार्डाला कमीजास्त अनेक प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिलेला आहे. त्याच्याऐवजी शहराचे लहान लहान असे पुष्कळ भाग पाडून त्या भागाला फक्त एकएकच प्रतिनिधी निवडण्याचा हक्क दिला तर हल्लीपेक्षा विशेष समाधानकारक रीतीने प्रतिनिधींची निवड होईल. याखेरीज लोकसंख्येच्या प्रमाणाने वेगवेगळ्या वार्डातील संख्या ठरविणे आणि मतविचाराची मर्यादा अधिक विस्तृत करणे या सुधारणाही आवश्यक आहेत. सध्या सधन लोकांची वस्ती असलेल्या वार्डापेक्षा अधिक प्रतिनिधी निवडून देण्यात येतात. ही गोष्ट लोकशाहीच्या तत्त्वाविरुध्द आहे. तसेच मताधिकार कमीतकमी दहा रुपये भाडे देणाऱ्यांना असल्यामुळे हजारो लोक मतदानाच्या हक्काला मुकतात. मताधिकार विस्तृत होऊन वयात आलेल्या प्रत्येक मनुष्याला मतदानाचा हक्क मिळाल्यास मतदारांची संख्या इतकी वाढेल की, खाजगी रीतीने भीडवशिल्याचा उपयोग करुन अथवा मते विकत घेऊन निवडून येणे सहसा शक्य होणार नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
'बहिष्कृत भारत'
दि. ०१-०३-१९२९

# महापरिनिर्वाण दिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना आपापल्या घरुन अभिवादन करता यावे, यासाठी चैत्यभूमी येथून समाज-माध्यमांद्वारे ऑनलाईन थेट प्रक्षेपण सुविधा पुढील लिंकवर उपलब्ध
  १. https://bit.ly/6december2023YT  २. https://bit.ly/6december2023FB
  ३. https://bit.ly/6december2023TT
- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते यांच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- बेवारस वस्तुंना स्पर्श करु नये व सदर बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा किंवा मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरीता पोलीस नियंत्रण कक्ष, महानगरपालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.
- रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करु नये.
- समुद्रात जाऊ नये.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे. महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे / वापराचे पाणी वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**



चैत्यभूमी (दादर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करताना महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी, मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उप मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू श्री. प्रकाश आंबेडकर, मा. पालकमंत्री (मुंबई शहर) श्री. दीपक केसरकर, मा. पालकमंत्री (मुंबई उपनगर) श्री. मंगल प्रभात लोढा, मा. मंत्री संजय राठोड, मा. खा. राहुल शेवाळे, मा. विधान परिषद सदस्य श्री. प्रवीण दरेकर आणि इतर मान्यवर.

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा-सुविधा व संबंधित माहिती



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन (६ डिसेंबर २०२२)



छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा



१ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा



'शॉवर' असलेल्या स्नानगृहांची व्यवस्था

(संग्रहीत छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०२२)

### दिनांक ०४ डिसेंबर ते ०७ डिसेंबर २०२३ पर्यंतचे भरती व ओहोटीचे वेळापत्रक

| सोमवार दि. ०४.१२.२०२३ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| भरती | पहाटे ०४:२६ | ३.८० मी. |
| ओहोटी | सकाळी ११:०० | २.१४ मी. |
| भरती | सायंकाळी ०४:२७ | २.९८ मी. |
| ओहोटी | रात्री ०९:५० | २.०४ मी. |

| मंगळवार दि. ०५.१२.२०२३ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| भरती | पहाटे ०५:१० | ३.६५ मी. |
| ओहोटी | दुपारी १२:०१ | २.०८ मी. |
| भरती | सायंकाळी ०५:३८ | २.८९ मी. |
| ओहोटी | रात्री ११:१९ | २.२८ मी. |

| बुधवार दि. ०६.१२.२०२३ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| भरती | पहाटे ०५:५९ | ३.५५ मी. |
| ओहोटी | दुपारी ०१:०२ | १.९२ मी. |
| भरती | सायंकाळी ०७:२५ | २.९७ मी. |

| गुरुवार दि. ०७.१२.२०२३ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| ओहोटी | मध्य रात्री १२:४८ | २.३८ मी. |
| भरती | सकाळी ०६:५३ | ३.४९ मी. |
| ओहोटी | दुपारी ०१:५४ | १.६९ मी. |
| भरती | रात्री ०८:४८ | ३.२४ मी. |


आपल्या लहान मुलांची व वृद्धांची काळजी घ्यावी. रांगेने व शिस्तबद्धरित्या चैत्यभूमीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे दर्शन घ्यावे. आपत्कालीन परिस्थितीत अनुयायांनी सैरावैरा न पळता परिस्थितीचा अंदाज घ्यावा. तसेच पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.




# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांच्या
जागतिक पाऊलखुणा






- महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
- अभिवादन रांग
- बाहेर जाण्याचा मार्ग
- वैद्यकिय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
- छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे अनुयायांकरिता १८ युनिटची (१८०) फिरते शौचालये व रांगेतील अनुयायांसाठी ०४ युनिटची (४०) फिरती शौचालये
- २०० स्नानगृहे
- निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
- वैद्यकीय कक्ष
- माननीय भंतेजी निवास व्यवस्था
- रूग्णवाहिका
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
- पोलिस नियंत्रण कक्ष
- अन्न वाटपाची व्यवस्था
- पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
- कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
- विद्युत खांब
- तात्पुरते अग्निशमन केंद्र
- जीवरक्षक बोटीची व्यवस्था
- तात्पुरती शौचालये
- पाण्याची सुविधा
- दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
- माहिती कक्ष
- श्रीमान बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळ
- प्लाझा सिनेमा



# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०२३ रोजीची प्रस्तावित व्यवस्था



## ■ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| व्यवस्था | दूरध्वनी |
|---|---|
| महानगरपालिका नियंत्रण कक्ष | १९१६ |
| आपत्कालीन व्यवस्थापन | २२६९ ४७२५-२७ |
| महानगरपालिका अग्निशमन दल (भायखळा) | १०१, २३०७ ६१११, २३००१३९३९४/९५ |
| महानगरपालिका अग्निशमन दल (वडाळा) | २४१३ २०६०-६२, २४१३२०५८ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महानगरपालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | २२६२ ०४३३ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०१४९ |
| अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| उप आयुक्त (परिमंडळ- २) | २४१५ ०४०० |
| सहाय्यक आयुक्त- 'जी उत्तर' विभाग | ६९५१ ७८०० / ६९५१ ७८०५ |
| जनसंपर्क अधिकारी | २२७५ ४०२५ |

## ■ इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/ २२०२ ४२४३ |
| मुंबई पोलिस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२० |
| मुंबई पोलिस उप आयुक्त (परिमंडळ- ५) | २४८८ ८४२१ / २४९२ ७३०८ |
| वाहतूक पोलिस | २४९३ ७७५५ |
| वाहतूक पोलिस नियंत्रण कक्ष (वडाळा) | ८६५७० ४५०१३ किंवा २४१४ ६५३३ |
| बेस्ट वाहतूक 'टोल फ्री' क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१४ ४८९७ व २४१४ ५८८८ |
| नागरी सुरक्षा दल | २२८४ ३६६७ |
| गृहरक्षक दल (होमगार्ड) मुख्यालय | २२८४ २४२३ / २२८४ ४१७१ |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | २२०२ ६२४२ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७ / ९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई | २४१२ २३९६ / २४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मुंबईचं नवं विकास पर्व



## बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वपूर्ण प्रकल्प



छत्रपती शिवाजी महाराज
जलतरण तलाव, अंधेरी



स्वातंत्र्य लढ्यातील हुतात्म्यांचे
भित्तीशिल्प, ऑगस्ट क्रांती मैदान



डबल डेकर वातानुकूलित बेस्टची बस



मृत प्राण्यांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी
उभारलेली विद्युत दाहिनी



नारायण गजानन आचार्य उद्यान,
वाहतूक बेट, चेंबूर



सागरी किनारा मार्ग,
हाजी अली येथील इंटरचेंज



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे उद्यान
गावदेवी, दहिसर



विद्यार्थी अभ्यासिका,
खोताची वाडी



मुंबई पब्लिक स्कूल, नेहरूनगर, कुर्ला



पी (पूर्व) विभाग कार्यालयाची
इमारत, गोरेगाव



एस्कलेटरने सुसज्ज स्कायवॉक,
लक्ष्मीबाई केळकर मार्ग, शिव



सुविधा केंद्र, चेंबूर

‘‘ संधी प्राप्त होणे आणि ती पदरात पाडून घेणे हे आपल्याकडे आहे.
शिक्षणाच्या अभावी ते सुसाध्य होत नाही ’’




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मृतिस्थळ, चैत्यभूमी, दादर.



बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुंबईतील चैत्यभूमी परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंगांवर आधारित भित्तीशिल्प साकारण्यात आले आहेत.



'' मनगटाच्या जोरावर संघर्ष केला पाहिजे. स्वतःच्या शिक्षणार्थ त्याने स्वतःच मदत केली पाहिजे.''



## त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त भावपूर्ण अभिवादन

( माता रमाई भीमराव आंबेडकर वरळी स्मशान भूमी
येथील माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा अर्धपुतळा)

# बाबासाहेब, तुमच्या आयुष्याचा हिशोब मला लागत नाही...

उणेपूरे मिळालेले ६५ वर्षांचे आयुष्य,
त्यात ३० वर्षे शिक्षणात
आणि १९४६ नंतरचा काळ दिल्लीत व्यस्त राहिलेला.
अवघी २५ वर्षे मिळाली बाबासाहेबांना
चळवळ आणि लेखनाला...

त्यात तब्येतीची अजिबात साथ नाही.
इतक्या थोड्या काळात हा माणूस
नियतकालिके चालवतो,
२३ ग्रंथ लिहितो,
शेकडो लेख लिहून
भाषणे करत राहतो.

मनुस्मृती दहन, चवदार तळे, काळाराम मंदिर आंदोलन,
शिक्षणसंस्था स्थापना, राजकीय पक्ष
स्थापन करुन निवडणुका,
गोलमेज परिषद आणि हजारो मैलांचा प्रवास...

वाचन लेखनावरची पकड सुटू न देता...

हे सारे सारे कसे जमवले असेल याचा हिशोब लागत नाही...

आजच्या नेत्यांसारखे विमान, हेलिकॉप्टर हाताशी नाही,
मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडियामधून पोहोचणे नाही,
अनुयायांना संदेश द्यायला Whatsapp नाही
की बोलायला फोन नाही...

खडबडीत रस्ते आणि रेल्वेतून गावकुसाबाहेरच्या
त्या नॉट रिचेबल वस्त्यावस्त्यावर

कसे वेगाने पोहोचले असतील बाबासाहेब?

कसे पोहोचत असतील त्यांचे संदेश
आंदोलनाचे,खेडी सोडण्याचे आणि पोरांना
शिकवण्याचे...

पुन्हा ज्यांच्याशी संवाद करायचा,
ती सारी माणसे टेक्नोसॅव्ही नसणारी...

फाटकी, निरक्षर, अन्यायाने पिचलेली, भेदरलेली

त्यांना समजेल अशा भाषेत हा पदवी घेतलेला
कायदेपंडित कोणत्या सुगम भाषेत बोलला असेल...?

की ज्या शब्दांनी गावाच्या पाटलासमोर नजर
वर न करणारी माणसे थेट व्यवस्थेची गचांडी
पकडू शकली.....

न बघितलेल्या या माणसावर कशी श्रद्धा
निर्माण झाली असेल त्या खेड्यापाड्यातील माणसांची...?

नुसत्या टाइम मॅनेजमेंटसाठी तुमचा अभ्यास
करायला हवा बाबासाहेब,

आणि माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी वापरलेल्या
तुमच्या पद्धती समजून घ्यायला हव्यात

कारण आज सगळी साधने हाताशी असूनही
आम्ही गावकुसाबाहेरच्या माणसांपासून
अनरिचेबल आहोत......

कोसो दूर....

- हेरंब कुलकर्णी
अकोले, जि. अहमदनगर

| श्री. रमाकांत बिरादार | डॉ. अश्विनी जोशी | डॉ. इ सिं चहल |
|---|---|---|
| उप आयुक्त (परिमंडळ-२) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक |

**तानाजी कांबळे**, जनसंपर्क अधिकारी, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथून प्रकाशित केले.
। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई. ।
**(ही पुस्तिका मोफत आहे)**
NS4259PRO-BMPP-66151-2023-24-1,00,000 COPIES